दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१३ एप्रिल २०२५


||सुविचार||

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे. जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांच्याशीही प्रेमानच वागल पाहिजे,
**ते चांगले आहेत म्हणून नाही,**
**तर तुम्ही चांगले आहात म्हणून.**

अर्थ मराठी






# महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेवेळी ही माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील रेल्वेच्या दर्जेदार पायाभूत सुविधेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्री.वैष्णव यांचे आभार देखील मानले.

या योजनेत समाविष्ट काही महत्त्वाची स्थानके म्हणजे – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर (मध्य आणि पश्चिम), अंधेरी, टिळक टर्मिनस, पुणे, नाशिक रोड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, अमरावती, भुसावळ, इत्यादी. तसेच, उपनगरीय आणि ग्रामीण भागातील अनेक स्थानकांनाही यात स्थान देण्यात आले आहे, जसे की – अकलकोट रोड, दौंड, इगतपुरी, चांदा फोर्ट, मालाड, डोंबिवली, चिंचवड इत्यादींचा समोवश आहे.

या योजनेमुळे स्थानकांवर प्रवाशांसाठी वेटिंग लाऊंज, फूड कोर्ट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्कलेटर्स आणि डिजिटल सुविधांसारख्या आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानकांचे सौंदर्यीकरण आणि शहराशी अधिक सुसंगत दळणवळण व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

**या पुनर्विकासात स्थानकांची नावे आणि त्यासाठीचा निधी पुढीलप्रमाणे आहे.**

अजनी स्टेशन– २९७.८ कोटी रुपये
नागपूर जं.– ५८९ कोटी रुपये
नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जं. – १७.४ कोटी रुपये



जालना– १८९ कोटी रुपये
छत्रपती संभाजीनगर– २४१ कोटी रुपये
रोटेगाव– १२ कोटी रुपये
अहिल्यानगर– ३१ कोटी रुपये
भायखळा– ३५.५ कोटी रुपये
चिंचपोकळी– ५२ कोटी रुपये
चर्नी रोड– २३ कोटी रुपये
छत्रपती शिवाजी महाराज टमिनल १८१३– कोटी रुपये
ग्रँट रोड– २७ कोटी रुपये
लोअर परेल– ३० कोटी रुपये
मरिन लाइन्स– २७.७ कोटी रुपये
सॅण्डहर्स्ट रोड– १६.४ कोटी रुपये
मुर्तिजापूर स्टेशन– १३ कोटी रुपये
बडनेरा– ३६.३ कोटी रुपये
बारामती– ११.४ कोटी रुपये
दौंड– ४४ कोटी रुपये
केडगाव– १२.५ कोटी रुपये
परळी वैजनाथ– २५.७ कोटी रुपये
भंडारा रोड– ७.७ कोटी रुपये
गोंदिया– ४० कोटी रुपये
तुमसर रोड– ११ कोटी रुपये
टिटवाळा– २५ कोटी रुपये
शेगाव–२९ कोटी रुपये
बल्लारशाह– ३१.४ कोटी रुपये
चंद्रपूर– २५.५ कोटी रुपये
चांदा फोर्ट– १९.३ कोटी रुपये
धुळे– ९.५ कोटी रुपये
लासलगाव– १०.५ कोटी रुपये
मनमाड– ४५ कोटी रुपये
नगरसोल– २०.३ कोटी रुपये

नांदगाव– २० कोटी रुपये
आमगाव– ७.८ कोटी रुपये
वडसा– २०.५ कोटी रुपये
हातकंणगले– ६ कोटी रुपये
हिमायतनगर– ४३ कोटी रुपये
हिंगोली डेक्कन– २१.५ कोटी रुपये
किनवट–२३ कोटी रुपये
चाळीसगाव– ३५ कोटी रुपये
अंमळनेर– २९ कोटी रुपये
धरणगाव– २६ कोटी रुपये
पाचोरा जं.– २८ कोटी रुपये
दिवा– ४५ कोटी रुपये
मुंब्रा– १५ कोटी रुपये
शहाड– ८.४ कोटी रुपये
कोल्हापूर – छत्रपती शाहू महाराज टर्मिनस ४३ कोटी रुपये
लातूर– १९ कोटी रुपये
जेऊर– २० कोटी रुपये
कुर्डूवाडी जं.– २० कोटी रुपये
फलटण– १ कोटी रुपये
वाठर– ८ कोटी रुपये
आकुर्डी– ३४ कोटी रुपये
चिंचवड– २०.४ कोटी रुपये
देहू रोड स्टेशन– ८.०५ कोटी रुपये
तळेगाव स्टेशन– ४०.३४ कोटी रुपये
मालाड स्टेशन– १२.३२ कोटी रुपये
कुर्ला जं. स्टेशन– २८.८१ कोटी रुपये
कांजुरमार्ग स्टेशन– २७ कोटी रुपये
विद्याविहार स्टेशन– ३२.८ कोटी रुपये
विक्रोळी स्टेशन– १९ कोटी रुपये
जोगेश्वरी स्टेशन– ११९ कोटी रुपये

माटुंगा स्टेशन– १७.३ कोटी रुपये
परळ स्टेशन– १९.४ कोटी रुपये
प्रभादेवी– २१ कोटी रुपये
वडाळा स्टेशन– २३ कोटी रुपये
भोकर स्टेशन– ११.३ कोटी रुपये
धर्माबाद स्टेशन– ३० कोटी रुपये
मुखेड जं.स्टेशन– २३ कोटी रुपये
उमरी स्टेशन– ८ कोटी रुपये
देवळाली स्टेशन– १०.५ कोटी रुपये
इगतपुरी स्टेशन– १२.५ कोटी रुपये
धाराशिव स्टेशन– २२ कोटी रुपये
गंगाखेड स्टेशन– १६ कोटी रुपये
मानवत रोड स्टेशन– १२ कोटी रुपये
परभणी जं. स्टेशन– २६ कोटी रुपये
परतूर स्टेशन– २३ कोटी रुपये रुपये
पूर्णा जं. स्टेशन– २४ कोटी रुपये
सेलू स्टेशन– २३.२ कोटी रुपये
हडपसर स्टेशन– २५ कोटी रुपये
गोधनी स्टेशन– २९ कोटी रुपये
काटोल स्टेशन– २३.३ कोटी रुपये
कामठी स्टेशन– ७.७ कोटी रुपये
नरखेड जं. स्टेशन– ३७.६ कोटी रुपये
कराड स्टेशन– १२.५ कोटी रुपये
सांगली स्टेशन– २४.२ कोटी रुपये
लोणंद जं.स्टेशन– १०.५ कोटी रुपये
सातारा स्टेशन– ३४.३ कोटी रुपये
बेलापूर स्टेशन– ३२ कोटी रुपये
कोपरगाव स्टेशन– ३० कोटी रुपये सेवाग्राम स्टेशन– १८ कोटी रुपये
धामणगाव स्टेशन– १८ कोटी रुपये
हिंगणघाट स्टेशन– २२ कोटी रुपये
पुलगाव स्टेशन– १६.५ कोटी रुपये
उरूली स्टेशन– १३ कोटी रुपये
वाशिम स्टेशन– २०.३ कोटी रुपये
मलकापूर स्टेशन– १९ कोटी रुपये
नांदुरा स्टेशन– १०.६ कोटी रुपये
रावेर स्टेशन– ९.२ कोटी रुपये
सावदा स्टेशन– ८.५ कोटी रुपये
दुधनी स्टेशन– २२ कोटी रुपये
पंढरपूर स्टेशन– ४० कोटी रुपये
सोलापूर स्टेशन– ५६ कोटी रुपये
नंदूरबार स्टेशन– १५ कोटी रुपये
पालघर स्टेशन– १७.५ कोटी रुपये

## थोडक्यात

### शिवरायांना महाराष्ट्रापर्यंत मर्यादित ठेवू नका : अमित शाह

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१२, रायगड :** स्व–धर्माचा अभिमान, स्व–राज्याची आकांक्षा आणि स्व–भाषेला अमर करणं हे विचार देशाच्या सीमेपुरते मर्यादित असू शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील नागरिकांना माझी हात जोडून विनंती आहे. शिवरायांना महाराष्ट्रापर्यंत मर्यादित ठेवू नका, छत्रपती शिवाजी महाराजांकडून देशच काय जग प्रेरणा घेऊ शकतं, असं आवाहन केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी रायगडावरुन केलं.

आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने रायगडावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित होते. यावेळी अमित शाह यांना शिंदेशाही पगडी आणि कवड्यांची माळ भेट म्हणून देण्यात आली. भाषणाच्या सुरुवातील त्यांनी जिजाऊंना अभिवादन केलं. ते म्हणाले, मी शिवचरित्र वाचलंय. जिजाऊंनी शिवरायांना केवळ जन्मच दिला नाही तर स्वराज्याची प्रेरणा दिली. एका बाळ शिवाला देशाला स्वतंत्र करण्याचा विचार जिजाऊंनी दिला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक बनवण्याचा विचारही जिजाऊंनी दिला. रायगडावर उभा असताना शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला नमस्कार करताना माझ्या मनात दाटून आलेल्या भावना मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. शिवरायांचा जेव्हा जन्म झाला तेव्हा देश अंध:कारात बुडाला होता. अशावेळी कोणाच्याही मनात स्वराज्याची कल्पना येण अशक्य होतं. कारण तेव्हा परिस्थितीच तशी होती. मात्र तरीही एक १२ वर्षांचा मुलगा जिजाऊंच्या प्रेरणेने प्रतिज्ञा सिंधू ते कन्याकुमारीपर्यंत भगवा फडकवण्याची प्रतिज्ञा करतो, हे अद्भूत आहे, असंही शाह यावेळी म्हणाले. मी आजपर्यंत जगातील अनेक नायकांचे चरित्र वाचले आहेत. मात्र अशी दृढ इच्छाशक्ती, दुर्दम्य साहस, रणनीती आणि ती रणनीती पूर्ण करण्यासाठी समाजातील प्रत्येक वर्गाला एकत्र जोडून कधीही पराभव न होणाऱ्या सैन्याची निर्मिती करणं शिवरायांशिवाय कोणीच करू शकलेलं नाही.

अमित शाह पुढे म्हणाले, मी आजपर्यंत जगातील अनेक नायकांचे चरित्र वाचले. मात्र अशी दृढ इच्छाशक्ती, दुर्दम्य साहस, जबरदस्त रणनीती आणि ती रणनीती पूर्ण करण्यासाठी समाजातील प्रत्येक वर्गाला एकत्र जोडून कधीही पराभव न होणाऱ्या सैन्याची निर्मिती करणं छत्रपती शिवाजी महाराजांशिवाय कोणीच करू शकलेलं नाही. स्व–धर्माचा अभिमान, स्व–राज्याची आकांक्षा आणि स्व–भाषेला अमर करणं हे विचार देशाच्या सीमेपुरते मर्यादित असू शकत नाही. हे मानवी जीवनाच्या स्वाभिमानाशी जोडलेले आहेत. शिवरायांनी हे तीन विचार गुलामगिरीत असताना जगासमोर ठेवले. मी इथं कसलंही राजकारण करण्यासाठी आलेलो नाही, शिवरायांच्या पायाशी नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. शिवरायांच्या स्मृतीतून अनुभूती घेण्यासाठी आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्यासाठी आलोय.

### देशभरात UPI सेवा विस्कळीत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** देशभरात आज UPI सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे ऑनलाईन पेमेट करण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. गगूल पे, फोन पे व पेटीएम सारखे ऑनलाईन पेमेंट प्लॅटफॉर्म नीट काम करत नाहीयत. त्यामुळे सर्वसामान्यांना पेमेंट देण्यास अडचणी येत आहेत. सध्या बहुतेक जण यूपीआय ॲपच्या माध्यमातून सर्व व्यवहार करतात. रोख रक्कम जवळ कमी ठेवतात. त्यामुळे त्यांचा त्रास आणखी वाढलाय.

UPI ची सेवा काही तांत्रिक अडचणीमुळे विस्कळीत झाली आहे, अशी माहिती छझउख नं दिली आहे. गेल्या वर्षभरात यूपीआय डाऊन होण्याची ही सहावी घटना आहे. Downdetector नं दिलेल्या माहितीनुसार १.१६८ युझर्सनं याबाबत तक्रार केली आहे. त्यामध्ये Google Pay चे ९६ आणि Paytm च्या २३ युझर्सनी ही तक्रार केली आहे. याबाबत माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टनुसार गेल्या दोन तासांपासून णझख सर्व्हिस डाऊन आहे. यामधील ६६ टक्के युझर्सनी पेमेंट फेल झाल्याची तक्रार केली आहे. तर ३४ टक्के युझर्सनी पैसे ट्रान्सफर करणे थांबल्याची तक्रार केली आहे. हा प्रकार एकाच बँकेपुरता मर्यादीत नसून अनेक बँकांना याचा फटका बसला आहे. २६ मार्च रोजी देखील बसला होता फटका यापूर्वी २६ मार्च रोजी UPI ची सेवा ठप्प झाली होती. त्यावेळी जवळपास अडीच तास यूपीआयच्या माध्यमातून देशभर होणारे व्यवहार ठप्प झाले होते. त्या दिवशी Google Pay, PhonePe आणि Paytm सारख्या बड्या ॲपच्या माध्यमातून पैसे ट्रान्सफर करणे हे 'मिशन इम्पॉसिबल' बनले होते.

# मनसेच्या व्यसपिठावर आमदार भास्करराव जाधव ; प्रमोद गांधी यांच्या कल्पकतेचं केलं कौतुक

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, शृंगारतळी (गुहागर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी संकल्पित सौजन्याने समाज एकता मनसे चषक २०२५ एक समाज एक संघ गुहागर तालुक्यात प्रथमच ह्या आगळीक अशा भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धेचे गुहागर मनसेने आयोजन केले असून दिनांक ११ ते १४ एप्रिल २०२५ रोजी गोल्डन पार्क (जाणवले फाट्याच्या समोर) शृंगारतळी येथे सदर स्पर्धा संपन्न होत आहेत.

ह्या स्पर्धेला गुहागर विधानसभा मतदारसंघातील विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधीं सह गुहागर तालुक्यातील समाज अध्यक्ष, समाज नेते मोठ्या संख्येने सदिच्छा भेट देत आहेत. दरम्यान ह्या क्रिकेट स्पर्धेला गुहागर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार भास्करराव जाधव यांनी विशेष सदिच्छा भेट देऊन सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. प्रसंगी आमदार भास्करराव जाधव यांचा गुहागर मनसेच्या वतीने




आयोजक तसेच गुहागर मनसे संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी शाल, पुष्पगुच्छ व मनसे छत्री देऊन स्वागत केले. प्रसंगी आ.भास्करराव जाधव यांनी गुहागर विधानसभा मतदारसंघात प्रमोद गांधी यांनी क्रिकेट स्पर्धेचा आगळा वेगळा उपक्रम राबविल्या बद्दल धन्यवाद देत त्यात एक समाज एक संघ अशी कल्पकता आहे, नाविन्यपूर्ण आहे.

त्यामुळे हा उपक्रम आदर्श निर्माण करणारा आहे असे आमदार जाधव मनोगतातून व्यक होत ह्या अभिनव उपक्रमला शुभेच्छा दिल्या.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात मनसेचे प्रमोद गांधी यांनी प्रचारात आघाडी घेऊन प्रतिस्पर्धी उमेदवारांना दमछाक दिली होती. निवडणुकीच्या निर्णय पटलावर गांधी यांना अपयशाला सामोरे जावे लागले.

मात्र, मनसेच्या प्रमोद गांधी यांची मते निर्णायक ठरली होती. अपयशाला खचून न जाता उद्योजक /समाजसेवक तसेच मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी समाजाप्रति आपली दायित्व सेवा अविरत चालू ठेवली आहे. निवडणूक नंतर आमदार भास्करराव जाधव प्रथमच मनसेच्या व्यासपीठावर उपस्थित राहिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. असे असले तरी राजकीय क्षेत्रात मैत्रीत्वाचे संबंध आणि मानवतेचा धर्म सर्वस्वी असतो हे प्रमोद गांधी संकल्पित समाज एकता मनसे चषक २०२५ एक समाज एक संघ उपक्रमातून प्रत्ययाला आले.

# बीडमध्ये नीट परीक्षेचा बाजार, २२ लाख उकळले !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, बीड :** बीड जिल्हा सध्या वेगवेगळ्या गुन्हेगारी घटनांमुळे राज्यात चर्चेत आहे. गुन्हेगारी घटणांची ही कीड शैक्षणिक क्षेत्रापर्यंत पसरली आहे. बीडमध्ये नीट परीक्षेचा जणूकाही बाजार मांडलाय की काय ? असा प्रश्न उपस्थित करणारा प्रकार समोर आलाय. त्याचबरोबर नीट परीक्षेत मार्क वाढवून देणारे रॅकेट सक्रिय असल्याचं देखील बोलले जात आहे..विशेष म्हणजे नीट परीक्षेत ६०० मार्क मिळवून देण्यासाठी तब्बल ५५ लाख रुपये रेट असल्याचं देखील बोललं जात आहे.

**काय आहे प्रकरण?**

तुमच्या मुलीला नीट परीक्षेत ६०० पेक्षा जास्त मार्क मिळवून देतो, असे म्हणत बीडमधील तिघांनी पालकांची २२ लाख रुपयांची फसवणूक केलीय.. पालकांनी तक्रार दिल्यानंतर बीडच्या शिवाजी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. पंचफुला मधुकर जगताप, मधुकर जगताप, उद्धव शंकरराव राऊत तिघेही राहणार बीड अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

या तिघांनी बीडमधील बस वाहकाच्या मुलीला नीट परीक्षेमध्ये ६०० पेक्षा जास्त मार्क्स मिळवून देऊन एमबीबीएसला नंबर लावून देतो, असं आमिष दाखवलं होतं. त्यासाठी ५५ लाख रुपये मागितले होते. त्यातील २२ लाख रुपये त्यांना देण्यात आले. फेब्रुवारी आणि एप्रिल २०२४ मध्ये हा प्रकार घडला.

परंतु निकालानंतर मुलीला कमी मार्क आल्याचे पाहून या पालकांनी आरोपींकडे पैशांची मागणी केली, परंतु त्यांनी नकार दिला. त्यामुळे तिडके या महिलेने शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली आहे.

# संपादकीय



## शिलाशिवाय विद्या फुकाची

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिला शिवाय विद्या फुकाची( व्यर्थ) आहे. हर्बर्ट स्पेन्सर या शिक्षण तज्ञांच्या मते, शिक्षण म्हणजे शील संवर्धन होय. शील म्हणजे चारित्र्य. थोडक्यात समाज विघातक दुष्ट गुण स्वतःमध्ये न बाळगता, समाज उपयोगी नीतिमान विचार कृती मध्ये आणणे,म्हणजे चारित्र्यसंवर्धन होय. देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची एक गोष्ट वाचण्यात आली. लालबहादूर शास्त्री रेल्वेमंत्री असताना ते त्यांच्या आईला, मी रेल्वेत नोकरीला आहे, असे सांगायचे. रेल्वेमंत्री असतानाही ते आपल्या आईला रेल्वे मधील कर्मचारी असल्याची खोटी माहिती देत होते. एके दिवशी त्यांची आई रेल्वेच्या एका जाहीर कार्यक्रम ांमध्ये आली होती. तेथे जमलेल्या लोकांना तिने आपला मुलगा देखील रेल्वेमध्ये कामाला आहे ; आणि आजच्या कार्यक्रमाला तो येणार आहे, असे सांगितले. त्याचे नाव लालबहादूर शास्त्री आहे असे तिने सांगितल्यानंतर साऱ्यांनी तिला वेड्यात काढले. तेवढ्यात दिल्लीहून लालबहादूर शास्त्री कार्यक्रम स्थळी आले. त्यांनी आपल्या आईकडे पाहिले. शास्त्रीजींनी आपल्या आईला घरी पाठवून दिले. तेथे उपस्थित पत्रकारांनी शास्त्रीजींना या गोष्टीबद्दल विचारना केली, त्यावेळेस शास्त्रीजी म्हणाले, माझ्या आईला माहित नाही, की मी रेल्वेमंत्री आहे. तिला जर माहित झाले, तर ती लोकांच्या कामांच्या शिफारसी घेऊन माझ्याकडे येईल. मी तिच्या कोणत्याही शिफारसी नाकारू शकणार नाही. त्यांच्या या उत्तराने पत्रकार अचंबित झाले. राजकारणातील अतिउच्च पदावर राहून देखील आपल्या जवळच्या लोकांना कोणताही वैयक्तिक फायदा मिळवून न देण्याबाबत इतकी दक्षता बाळगणारे लालबहादूर शास्त्री यांचे चारित्र्य तेजस्वी आणि ओजस्वी नक्कीच होते. आजकाल सुईच्या टोका इतपत जरी सत्ता मिळाली, तरी तिचा उपयोग पहिल्यांदा आपल्या घरातील व्यक्तींना, नंतर नातेवाईक, मित्रमंडळी यांना मिळवून देणारेच पाहायला मिळतात. आपल्या चारित्र्याची इतक्या अतिउच्च दर्जाची जपणूक करणारे लोक समाजामध्ये विरळच असतात.

याच संदर्भात मागील आठवड्यात पुण्यात घडलेल्या एका दुःखद घटनेचा उल्लेख करावा लागेल. तेथील एका नावाजलेल्या रुग्णालयात १० लाखांची अनामत रक्कम भरण्यास नसल्यामुळे एका गर्भवती म हिलेचा मृत्यू झाला. वैद्यकीय व्यवसायात मानवतेचा दृष्टिकोन बाळगून उपचार करणे याला प्राथमिकता द्यायला हवी होती. त्या महिलेच्या उपचाराला सुरुवात करायला हवी होती, परंतु तेथे पैशाला प्राधान्य देण्यात आले. पैशाची मागणी करणारा डॉक्टर ज्ञानी होता, पण शीलवान नव्हता. ` याचे हे जळजळीत उदाहरण आहे.असे शिकले सवरलेले पण शीलरहित लोक सर्वच क्षेत्रात पाहायला मिळतात. त्यांच्यामुळे समाजाचे फार मोठे नुकसान होत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, दुसऱ्याला फसवण्यासाठी चातुर्य आणि बुद्धी लागते. परंतु त्याला सदाचाराची अर्थात शीलाची जोड मिळाली तर लबाडी, फसवाफसवी करावीशी वाटणार नाही . म्हणून शिकल्या सवरलेल्या लोकांत शीलाची अत्यंत जरूरी आहे. शीलाशिवाय शिकलेले लोक जन्माला येऊ लागले तर समाजा, राष्ट्राचा नाश होतो. म्हणून शीलाची किंमत शिक्षणापेक्षा अधिक आहे.

हर्बर्ट स्पेन्सर यांनी, सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण. असे देखील म्हटले आहे. सर्वांग सुंदर जीवन जगण्यासाठी आनंद आणि आत्मविश्वास हवा असतो. आत्मविश्वास हा स्वतःच्या उत्तम चारित्र्यामधून येतो. आनंदी जीवन जगण्यासाठी आपली दृष्टी निकोप असली पाहिजे. आपल्या जवळ असणारी शक्ती, युक्ती,धन संपदा, सत्ता,ज्ञान याचा जेव्हा जेव्हा आपण दुसऱ्याच्या भल्यासाठी वापर करतो, तेव्हा तेव्हा आपल्याला खरा आनंद मिळत असतो. त्याचबरोबर स्वतःमधील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर या सहा भावनांवर अर्थात षड्रिपूवर विजय मिळवणारा व्यक्ती खऱ्या अर्थाने आनंदी होत असतो. 'अंतर्मन ' हे खऱ्या अर्थाने शिकण्याचे साधन आहे. या अंतर्मनाला निकोप, बलवान, चौकस,औदार्यपूर्ण, समर्पक भाव असणारे आणि महत्वाचे म्हणजे चारित्र्यवान बनवण्याचे काम शिक्षणाच्या माध्यमातून झाले पाहिजे. कारण शीला शिवाय विद्या फुकाची ठरते.

# पैशापेक्षा माणसे व माणुसकी महत्त्वाची....



आजकाल समाजात एक वेगळेच वातावरण निर्माण झाले आहे. लोक पैशासाठी व संपत्तीसाठी माणुसकीला लाथाडून झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहत आहेत. म्हणूनच की काय? हल्ली समाजात व गावात झटपट श्रीमंत होण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. कारण आजकालची बहुतांश माणसे पैशाच्या मागे बेभानपणे धावताना दिसत आहेत. सारखा पैसा पैसा करून स्वतःला दुःखाच्या खाईत लोटत आहेत. भरपूर पैसा व संपत्तीच्या हव्यासापायी सख्या भावाचा पक्का वैरी बनून काटा काढत आहेत. स्वतःच्या आईवडिलांना पैशाच्या म ोहापायी घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत. म्हणजे त्यांना पैशापुढे आपले आईवडील, आपली माणसे, जवळचा मित्र परिवार, नातेवाईक व समाजबांधव यांचे काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. त्यांना फक्त पैसा आणि पैसाच सर्वस्व वाटत आहे. पैशापुढे त्यांना सर्व गोष्टी तुच्छ वाटत आहेत. आणि पैसा म्हणजे त्यांना सर्वात जवळचा व प्रिय वाटत आहे. म्हणून ते अहोरात्र पैशाच्या मागे धावताना दिसतात. पैशासाठी व संपत्तीसाठी माणुसकीला लाथाडून जवळची माणसे दूर करतात. आणि पैशापुढे लोटांगण घालून पैशाला सर्वस्व म ानतात. पण इथे पैशापेक्षा माणसे व माणुसकी फार महत्वाची असते. हे आपल्याला कधी कळणार आहे? आयुष्यात गेलेला पैसा व संपत्ती कधीही मिळवता येईल. पण आयुष्यातून एकदा गेलेला माणूस परत कधीच मिळवता येत नाही. म्हणून इथे माणसाला व माणुसकीला फार महत्त्व आहे. म्हणून प्रत्येकाने माणूस व माणुसकी जपणे फार गरजेचे आहे. त्याचबरोबर मानवता धर्म पाळून मानवतेला स्वीकारणे काळाची गरज आहे.असे मला वाटते.

कारण आजकाल बहुतांश लोकांना पैशाच्या अति-मोहापायी आपल्यातील माणुसकी रसातळाला जाऊन लोप पावत आहे, हे पण कळत नाही. फक्त पैसा मिळवून झटपट श्रीमंत होणे हेच त्यांचे जीवन ध्येय बनले आहे. म्हणूनच या नादात माणुसकी लयाला जाऊन फक्त नावालाच शिल्लक राहिली आहे. कारण पैशाच्या व संपत्तीच्या हव्यासापोटी सख्खे भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीच्या पायऱ्या चढत आहेत.आपल्याच मित्राला, नातेवाईकाला किंवा जवळच्या व्यक्तीला आर्थिक लाभासाठी फंदात पाडत आहेत. त्यांना ठार मारण्याची धमकी देत आहेत. पैशासाठी स्वतःच्या अब्रूला व स्वाभिम ानाला वेशीवर टांगत आहेत. आणि जगाला मी किती माणुसकी हिन आहे, हे दाखवून देत आहेत. असेच म्हणावे लागेल. कारण आपल्या भारतात एकेकाळी माणसाला व माणुसकीला फार महत्त्व होते. माणसे माणुसकीला जिवापाड जपत होते. मानवता हाच धर्म आहे असे इतरांना ठणकावून सांगत होते. समाजात व गावात माणुसकीचे प्रदर्शन करत होते. पैशाला व संपत्तीला माणसांपेक्षा कमी महत्त्व देत होते. त्याकाळी लोकांना पैशाचा व संपत्तीचा तेवढा हव्यास नव्हता. माणूस पैशापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व देत होता. म्हणून तेव्हा सर्वत्र माणुसकीचा बोलबाला असायचा. माणूस निस्वार्थ भावनेने इतरांना संकटकाळात मदत करायचा. तेव्हाचा माणूस स्वार्थी, लबाड व ढोंगी नव्हता. फक्त आणि फक्त माणुसकीलाच प्राधान्य देत होता. तेव्हाच्या लोकांमध्ये माणुसकी ठळक दिसायची व बावनकशी सोन्यासारखी चमकायची.

पण तशी माणुसकी आजच्या लोकांमध्ये का दिसत नाही? आताचा माणूस पैशाचा व संपत्तीचा इतका लोभी का झाला आहे? माणूस माणसापेक्षा पैशाला का महत्त्व देत आहे? हे कळायला मार्ग नाही. मी असेही म्हणत नाही की, जीवनात पैसा महत्त्वाचा नाही. पैसा तर महत्त्वाचा आहेच. तो जरूर कमवावा. पण माणुसकीला विसरून नाही. कारण या जगात पैशापेक्षा माणुसकी श्रेष्ठ आहे. इथला माणूस श्रेष्ठ आहे. हे आपल्याला सगळ्या भारतीय महापुरुषांनी, संतांनी व विचारवंतांनी वेळोवेळी सांगितले आहे. लिहून ठेवले आहे. तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी जर ठरवले असते, तर आयुष्यात भरपूर पैसा व संपत्ती जमवली असती. पण त्यांना माणुसकी व इथले माणसे महत्त्वाची होती. म्हणून त्यांनी पैशापेक्षा माणसाला व माणुसकीला जास्त महत्त्व देऊन, स्वतःबरोबर बहुजन जनतेलाही म ाणुसकीने व प्रेमाने वागण्याचा संदेश दिला. म्हणून आजही या मानवतावादी महापुरुषांना लोकांच्या मनामध्ये आदराचे अढळ स्थान आहे. ते स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. म्हणून आपणही या महापुरुषांचा आदर्श घेऊन मानवतावादी जीवन जगावे.आणि पैशापेक्षा व संपत्तीपेक्षा माणुसकीला महत्त्व देऊन समाजात व गावात मानवता रुजवावी. कारण इथे माणसाला व माणुसकीला फार महत्त्व आहे....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# ठाणे जिल्ह्यात अवैध वसतिगृहातून २९ बालकांची सुटका; ५ जणांवर गुन्हा दाखल

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे 'पसायदान विकास संस्था' या नावाने चालविल्या जाणाऱ्या एका अनधिकृत बालकांच्या निवासी संस्थेतून जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करत २९ बालकांची सुटका केली आहे.

संस्थेत बालकांना जबर मारहाण तसेच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याची तक्रार चाईल्ड हेल्प लाईनवर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या प्रकरणी संस्थेचे संचालक, त्यांच्या पत्नी, मुलगा आणि त्यांना म दत करणारे दोन अशा एकूण पाच जणांविरुद्ध बाल न्याय अधिनियम २०१५ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, १० एप्रिल २०२५ रोजी चाईल्ड हेल्प लाईनवर खडवली येथील 'पसायदान विकास संस्था' बाबत तक्रार आली होती. तक्रारीमध्ये संस्थेत बालकांना शारीरिक मारहाण केली जात असून लैंगिक अत्याचार होत असल्याचे नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची तातडीने दखल घेत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या पथकाने ११ एप्रिल रोजी पोलिसांना सोबत घेऊन संस्थेची पाहणी केली. या पाहणीदरम्यान आणि बालकांशी संवाद साधल्यानंतर त्यांना शारीरिक इजा पोहोचेल, अशा प्रकारे मारहाण तसेच अल्पवयीन मुलींसोबत लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले.

या गंभीर प्रकाराची दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत संस्थेत असलेल्या २९ बालकांची सुटका केली. यामध्ये २० मुली आणि ९ मुलांचा समावेश आहे. सुटका केलेल्या सर्व बालकांना बाल कल्याण समितीसम ोर सादर करण्यात आले. समितीने रात्री उशिरापर्यंत या बालकांच्या देखरेखेबाबत आदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

या प्रकरणी संस्थेचा संचालक बबन नारायण शिंदे, त्यांची पत्नी आशा बबन शिंदे, संचालक मुलगा प्रसन्न बबन शिंदे, त्यांना मदत करणारा प्रकाश सुरेश गुप्ता आणि दर्शना लक्ष्मण पंडित या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी खडवली येथील रहिवासी आहेत. सुटका करण्यात आलेल्या बालकांपैकी काही खडवली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत होते. त्यांची आगामी परीक्षा लक्षात घेता, शिक्षण विभागाने त्यांच्या परीक्षेसाठी विशेष व्यवस्था करावी, यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधण्यात येत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाने या प्रकरणी तत्परतेने कार्यवाही केली असून, बालकल्याण समितीच्या आदेशानुसार सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. सध्या या बालकांना उल्हासनगर येथील मुलींचे विशेषगृह/बालगृह तसेच कनिष्ठ व वरिष्ठ मुलांचे शासकीय बालगृहात सुरक्षितपणे दाखल करण्यात आले आहे.

## विश्वस्त..

कशीसावरायची घडी
कसे कळणारं तटस्था
वादळे मनात आदळे
कसे समजावे त्रयस्था

कुटूंबभार पेला सहज
कर्तव्य प्रदान गृहस्था
थरथरूलागता आत्मा
सरळ जावे वानप्रस्था

विकोपाला वाद जाता
दोषी ठरवता मध्यस्था
बुडाखाली आग लागे
माहिती नसे अस्वस्था

उध्वस्त होणार मनोरा
रस्ता दावता बेशिस्ता
राक्षसी वृत्ती फोफावी
हतबल होतो फरिस्ता

कसा द्यायचा उपदेश
कान नसती आक्रस्ता
वाटा घाटी अटीतटीत
बदनामी रे सद्गृहस्था

उन्मळू पडली आस्था
लयास धर्मादायसंस्था
गिळंकृत करतो असूर
पातक माथी विश्वस्ता

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कृतीयुक्त शिक्षणाला पर्याय नाही....



शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे,जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे,जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय द्यावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय.

**शिक्षणाने होत आहे रे आधी शिक्षण घेतलेच पाहिजे.**

आधुनिक कवितेचे जनक केशवसुत यांच्या कवितेतील या ओळी बरेच काही सांगून जातात. जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षण तज्ञांनी, विचारवंतांनी, समाज सुधारकांनी, जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दिशा देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

२१ व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण व अनुभव आधारित शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षण तज्ञाचे प्रगट होणारे विचार निश्चितच येणाऱ्या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये राष्ट्रीय शिक्षण आराखडा २०२० निश्चितच मार्गदर्शक ठरेल असे माझे मत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यात कृती शिक्षणावर भर दिलेला आहे. प्रश्न असा निर्माण होतो आजच्या स्पर्धेच्या युगात, कृतीयुक्त शिक्षणाची गरज आहे का? मी म्हणेल होय. कृतीयुक्त शिक्षण हे आजच्या स्पर्धेच्या युगात अतिशय आवश्यक आहे.

आजच्या तंत्रज्ञानयुगात शिक्षणाची पद्धत झपाट्याने बदलत आहे. पारंपरिकपाठ्यपद्धतीच्या तुलनेत कृतीयुक्त शिक्षण (अलींळींळूं-इरीशव ङशरअॅपळपस) अधिक प्रभावी ठरत आहे. कृतीयुक्त शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती, प्रयोग, चर्चा आणि उपक्रमांच्या माध्यमातून शिकविण्याची पद्धत. हे शिक्षण विद्यार्थ्यांना केवळ पाठांतरावर अवलंबून न ठेवता अनुभव आधारित ज्ञान मिळविण्यास प्रवृत्त करते. सखोल समज निर्माण होते कृतीद्वारे शिकल्याने संकल्पना स्पष्ट होतात आणि त्यांचा उपयोग वास्तविक जीवनात कसा करता येतो हे समजते.

सहभाग व सक्रियता वाढते विद्यार्थी केवळ ऐकणारे किंवा पाठांतर करणारे न राहता शिक्षण प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होतात.

सृजनशीलता आणि विचारशक्ती विकसित होते. समस्या सोडवण्याचे कौशल्य, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता आणि निर्णयक्षमता विकसित होते. स्वयंअध्ययनाची सवय लागते. कृतीयुक्त शिक्षणामुळे विद्यार्थी स्वयंपूर्ण होतात आणि शिक्षकांवर पूर्णपणे अवलंबून राहत नाहीत. संवाद कौशल्य आणि सहयोग वाढते. गटातील चर्चासत्रे, प्रयोग आणि खेळ यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य , टीमवर्क आणि नेतृत्वगुण विकसित होते.

**कृतीयुक्त शिक्षणाच्या पद्धती**

प्रयोग आणि प्रात्यक्षिके विज्ञान आणि गणितासारख्या विषयांमध्ये प्रयोगशाळेतील कार्य महत्त्वाचे ठरते. प्रकल्पाधारित शिक्षण विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयावर प्रकल्प दिल्यास ते स्वतः संशोधन करून शिकतात.

रोल-प्ले आणि अभिनय इतिहास, समाजशास्त्र आणि भाषा शिकवण्यासाठी हा उत्तम मार्ग आहे. खेळ आणि शैक्षणिक उपक्रम शिक्षण अधिक मनोरंजक आणि सहज बनवण्यासाठी शिक्षणाशी निगडित खेळांचा वापर करता येतो.

फील्ड व्हिजिट आणि प्रत्यक्ष अनुभव शैक्षणिक सहली, ऐतिहासिक ठिकाणी भेटी यामुळे प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी बुनियादी शिक्षण यामध्ये शिक्षण आणि श्रम यांना जोडले तसेच हस्तकला आणि जीवन उपयोगी कौशल्याच्या मदतीने शिक्षणाची प्रक्रिया समृद्ध करण्यावर भर दिला तर रवींद्रनाथ टागोर यांनी आपल्या शांतिनिकेतन या शिक्षण संस्थेत कृतीवर आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंबन केला होता तसेच निसर्गाशी जोडलेले कला आणि प्रयोगशील शिक्षण यावर भर दिला होता.शिक्षण तज्ञांच्या मते अनुभवावर आधारित शिक्षण हे दीर्घकाळ टिकते, सृजनशील विचारशक्तीला चालना देते. म्हणूनच आजच्या स्पर्धेच्या युगात कृतीयुक्त शिक्षणाला पर्याय नाही.

**- केतन घनश्याम कामडी**
**(सहायक शिक्षक)**
**स्वामी विवेकानंद विद्यालय,**
**देवलापार जि.नागपूर ९१५८२४६६०९**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अहिल्यानगर जिल्ह्यात सूर्य आग ओकू लागला

### उन्हाचा पारा ४० पार करण्याची शक्यता; दुपारी प्रखर उन्हाचा तडाखा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरणासह काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावल्यानंतर जिल्ह्यात पुन्हा उन्हाचा तडाखा वाढला आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, येत्या ५ दिवसांत तापमान चाळीशी पार जाण्याची शक्यता आहे. १२ वाजेच्या दरम्यान मुख्य चौकात, रस्ते आणि बाजारपेठांतही शुकशुकाट दिसत आहे. आरोग्य विभागाने जिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यात सकाळी १० वाजेपासून प्रचंड उष्णता निर्माण होत असून, दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत तापमान ४० अशांच्यावर पोचते आहे. त्यामुळे रस्त्यावर फिरणं आणि बाहेर काम करणे अधिक कठीण होऊन बसले आहे. शेतकरी, मजूरी करणारे व रस्त्यावर काम करणाऱ्यांवर याचा अधिक परिणाम जाणवत आहे. शेतकरी शेतीची कामे सकाळ व सायंकाळच्या प्रहरी करत आहेत. सध्या शेतात उन्हाळी कामे सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांना अत्याधिक उन्हात बाहेर पडणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे दिसल्यानंतर तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे सांगितले आहे. जिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला आहे. यासाठी पुरेशी औषधेही उपलब्ध करून देण्यात आली आहे. १५ व १६ एप्रिलला उष्णतेची तीव्रता अधिक जाणवण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शक्यतो दुपारच्या प्रहारात घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, थेट उन्हाचा संपर्क कमी ठेवावा आणि विशेषतः लहान मुले, जेष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींनी काळजी घ्यावी, असा इशारा आरोग्य विभाग व हवामान तज्ज्ञांनी दिला आहे.

## बी.डी.कॉलेज ६ पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१२, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या करियर कट्टा या उपक्रमांतर्गत पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटी संचालित बाळासाहेब देसाई कॉलेजला ६ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उच्च शिक्षणाला बळ मिळावे या उद्देशाने हा अभिनव उपक्रम गेल्या ४ वर्षापासून सुरु आहे. या उपक्रम ंतर्गत सन २०२४ -२५ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या 'राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२४-२५' निकाल जाहीर करण्यात आला. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणला ६ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर विभागातून उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून प्रथम क्रमांक तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय यामध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे. तर उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य डॉ. एस.डी.पवार यांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणून डॉ.संदीप तडाखे यांना प्रथम क्रमांक पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हास्तरीय तालुका समन्वयक प्रा.गणेश गायकवाड प्रथम क्रमांक तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून प्रा.गंगाराम चव्हाण प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयास ६ पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पाटण तालुक्याचे भाग्यविधाते माजी मंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर आणि पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकचे संचालक श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांनी अभिनंदन केले. तसेच कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष, प्रकाशराव पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ.सुहास देशमुख, संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हाण तसेच महाविद्यालयाच्या नॅक समन्वयक डॉ.एच.व्ही.काटे सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवर्ग तसेच पाटण तालुक्यातील विविध सामाजिक संघटना या सर्वांनी अभिनंदन केले.

## नव उद्योजकांसाठी स्टँडअप इंडिया मार्जिन मनी कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, ठाणे :** अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी. तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी. या उद्देशाने दि.०४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत राज्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाअंतर्गत सहा. आयुक्त, समाज कल्याण, ठाणे या कार्यालयामार्फत केंद्रशासनाच्या स्टँडअप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करुन देणे या योजनेची माहिती देण्याकरिता विशेष कार्यशाळेचे आयोजन सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, कळवा जि.ठाणे येथे करण्यात आले होते.कार्यशाळेम ध्ये अनु.जाती नवबौद्ध संवर्गातील होतकरू नवोद्योजकास स्टैंड अप योजने अंतर्गत प्रकल्प मंजूरीसाठी मार्जिन मनी उपलब्ध करुन त्यास आर्थिक सक्षम बनविण्याचा महाराष्ट्र शासनाचा मुख्य उद्देश असुन स्टँडअप योजने अंतर्गत बँकेने ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर व अनु.जातीच्या नव उद्योजकाने १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर एकुण प्रकल्प किंमतीचा १५ टक्के हिस्सा (फ्रंट एंड सबसिडी) राज्य शासनामार्फत देण्यात येतो याबाबतची माहिती समाधान इंगळे, सहा.आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांनी उपस्थितांना दिली. कार्यशाळेच्या अखेरीस व्याख्याते पंकज साळवे यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करुन त्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन केले.

कार्यशाळा पार पडल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करतांना केंद्र शासनाच्या स्टॅन्डअप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांकरीता मार्जिन मनी उपलब्ध करुन देणे या महाराष्ट्र शासनाच्या महत्वपुर्ण योजनेची माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण ठाणे यांनी आयोजित केलेल्या कार्यशाळेद्वारे मिळाल्यामुळे उपस्थितांनी महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले.

## निघोजच्या मळगंगा देवीच्या यात्रेला पाणी टंचाईचे संकट

### कपिलेश्वर बंधाऱ्यात ४ दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची यात्रा गेल्या शुक्रवार ११ एप्रिलपासून सुरू झाली असून ऐन मुख्य यात्रेच्या वेळी पिण्याच्या पाणी टंचाईचे संकट येण्याची शक्यता असून जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार काशीनाथ दाते यांनी पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी शासन पातळीवर पाणी सोडण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करावी. अशी मागणी भावीक व जनतेतून होत आहे. कुकडी डावा कालव्याला गेली दोन महिने पाणी सोडण्यात आले होते.



२५ दिवसांपूव निघोज येथील पुष्पावती नदीपात्रात असलेला कपिलेश्वर बंधारा भरून घेण्यात आला. मात्र बंधाऱ्याला असलेले लोखंडी दरवाजे खराब असल्याने नजीक असलेल्या शेतीमुळे बंधारा कोरडा पडला.

आजमितीला फक्त चार दिवस पुरेल एवढेच पाणी पिण्यासाठी उपलब्ध आहे. या बंधाऱ्यावर निघोजची नळपाणी पुरवठा योजना अवलंबून असल्याने यात्रेच्या दरम्यान म्हणजे साधारण १७ एप्रिलपर्यंत या बंधाऱ्यासाठी पाणी सोडण्याची गरज निर्माण झाली आहे. देवीच्या यात्रेसाठी २१ ते २८ एप्रिलपर्यंत लाखो भाविक याठिकाणी निवासी असतात. संपूर्ण यात्राकाळात येणाऱ्या भाविकांची संख्या ५ ते ६ लाखांच्या आसपास असते. मुख्य यात्रेच्या ४ दिवसांत फक्त पिण्यासाठी कोट्यवधी लिटर पाण्याची आवश्यकता असल्याने १७ रोजी पाणी सोडण्याची मागणी होत आहे. सचिन पाटील वराळ हे राज्याचे जलसंपदामंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कट्टर समर्थक आहेत ते पाणी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

तसेच आमदार काशीनाथ दाते यांच्याकडे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष ॲड.बाळासाहेब लामखडे, रमेशशेठ वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या कार्याध्यक्षा सुधामती कवाद आदी प्रयत्नशील आहेत.

## १२ कंपन्यांसोबत सामंजस्य करार, १४ हजार थेट रोजगार होणार उपलब्ध

### जिल्ह्यात उद्योगांना भरारी देण्यासाठी १७४३१ कोटींची गुंतवणूक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, चंद्रपूर :** राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा एक भाग असलेल्या 'औद्योगिक गुंतवणूकीस पोषक वातावरण निर्मिती' अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांना भरारी देण्यासाठी १२ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. या उद्योगातून जिल्ह्यात १७४३१ कोटींची गुंतवणूक होणार असून त्यातून थेट १४१०० रोजगार उपलब्ध होणार आहे. नियोजन भवन येथे दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा प्रशासन व जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने डिस्ट्रीक्ट इन्व्हेस्टमेंट सम ीर-२०२५ चे आयोजन करण्यात आले. यावेळी मंचावर आ. सुधीर मुनगंटीवार, आ.किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उद्योग विभागाचे सहसंचालक गजेंद्र भारती, मैत्री संस्थेचे नोडल अधिकारी पदमाकर हजारे, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे संचालक अशोक खडसे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्य, विनोद ठोंबरे आदी उपस्थित होते.

यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, महाराष्ट्राच्या उद्योग क्रांतीम ध्ये चंद्रपूर जिल्हा अग्रेसर असावा. आज सामंजस्य करार झालेल्या १२ उद्योगांपैकी ७ स्टील उद्योग आहे. राज्यातील एकूण खनिज संपत्तीपैकी नागपूर विभागात ६० टक्के खनिज आहे. तर नागपूर विभागाच्या एकूण खनिजांपैकी ७५ टक्के खनिज संपत्ती चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आहे. विविध क्षेत्रातील उद्योग चंद्रपुरात यावे, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

उद्योगांसाठी जागा, पाणी व इतर मुलभूत सोयीसुविधा चंद्रपूरमध्ये उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आ.किशोर जोरगेवार म्हणाले, चंद्रपूर जिल्हा देशाच्या मध्यभागी असून उद्योगासाठी वीज, रस्ते, पाणी आणि जमीन येथे मुबलक प्रमाणात आहे. तसेच दळणवळणाच्या उत्तम सोयीसुविधा असल्यामुळे गुंतवणूकदार येथे येतात. जिल्ह्यातील ३५ हजार एकर जागा उद्योगांना द्यावी लागणार आहे. विनय गौडा म्हणाले, उद्योजकांना जिल्हा प्रशासन पूर्ण सहकार्य करेल. या उद्योगामुळे जिल्ह्यात रोजगारनिर्मिती होण्यास मदत मिळेल. जिल्ह्यात इन्व्हेस्टमेंट प्रमोशन कमिटी स्थापन करण्यात आली असून या माध्यमातून अडी-अडचणी सोडविण्यात येत आहे. प्रास्ताविक सहसंचालक गजेंद्र भारती यांनी केले. संचालन श्याम हेडाऊ यांनी केले. आभार महाव्यवस्थापक ऋतुराजाचा सुर्य यांनी मानले.



### सर्वाधिक गुंतवणूक चंद्रपूर जिल्ह्यात

सामंजस्य करार करण्यात आलेल्या १२ कंपन्यांपैकी ७ उद्योग स्टील क्षेत्राशी संबंधित आहे. तर मायनिंग, बायोफ्युएल, रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चरल,

डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग आणि केमिकल टेस्टींग क्षेत्राशी संबंधित प्रत्येकी एक उद्योग आहे. विशेष म्हणजे शासनाने नागपूर विभागाला १४ हजार कोटींचे लक्ष्य दिलेले असतांना एकट्या चंद्रपूर जिल्ह्याने १७४३१ कोटींची गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक यावर्षी आत्तापर्यंत राज्यात कोणत्याही एका जिल्ह्याने आकर्षित केलेली सर्वाधिक आहे.

## पंढरपुर शहरातील वाळु तस्कर विकास मेटकरी येरवडा कारागृहात स्थानबध्द

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** अवैधरित्या वाळू उपसा करून दहशत पसरविणारा पंढरपूर येथील सराईत वाळू तस्कर विकी उर्फ विकास मेटकरी यास येरवडा येथील कारागृहात एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाणे हददीत अवैधपणे वाळू उपसा करून ती बेकायदेशीपणे विक्री व्यवसाय करणारा वाळु तस्कर तसेच शरीराविषयक गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार विकी उर्फ विकास म धुकर मेटकरी रा.देवकते मळा, पंढरपूर जि.सोलापुर हा अवैधरित्या वाळु चोरी करणे ती विक्री करणे सोयीचे व्हावे.

या करीता दहशत माजवण्या करीता अवैध वाळुचे कारणावरून जिव घेणे हल्ले करणे तसेच पंढरपूर शहर व पंढरपूर शहरा लगतच्या परीसरातील लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वाळु) चोरी करणे असे गुन्हे करण्याची त्यास सवय होती जे की, भारतीय न्याय संहिता २०२३ मधीत प्रकरण ६ व १७ मधील अपराधी स्वरूपाची कृत्ये असून



सदरची कृत्ये करण्याची त्यास सवय जडली होती.

एक धोकादायक व्यक्ती म्हणुन त्याने स्वतः ला सिध्द केले होते त्याचे विरुध्द अनेकवेळा अवैध वाळु व्यवसायाशी संबंधित तसेच शरीराविषयी गुन्हे दाखल होवुन त्याम ध्ये अटक करण्यात आली होती. परंतु तो सदर गुन्ह्यात जामीन मिळवुन अवैध वाळु व्यवसाय अव्याहतपणे सुरू होता त्यांनतर ही त्यावर पंढरपूर शहर पो. ठाणे गुरनं ८१/२०२५ भादवि कलम ११८,३५२,३५१,३ (५) वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता तो कायदयाला जुमानत नव्हता म्हणुन सराईत वाळु तस्कर गुन्हेगार नामे विकी उर्फ विकास मधुकर मेटकरी रा. देवकते मळा, पंढरपूर जि. सोलापुर याच्याविरूध्द वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टी व औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती, द्रकशाव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, अत्यांवश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती, वाळू तस्कर यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे विषयीचा कायदा सन १९८१ मधिल कलम ३(१) अन्वये स्थानबध्द करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक सो, सोलापुर ग्रामीण यांचे मार्फतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सो सोलापुर यांना पाठविणेत आला होता.

त्याअनुषंगाने स्थानबध्दतेचे कामकाज चालवुन त्यांनी एम.पी. डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केलेने त्यास ताब्यात घेवुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे एक वर्षाकरीता स्थानबध्द करणेत आलेले असुन पंढरपुर शहरातील वाळु तस्कर व शरीराविषयीचे गुन्हे करणारे व गुन्हेगारी पार्श्वभुमी असणारे गुन्हेगारांवर अशा प्रकारची कारवाई करणेची प्रक्रिया चालू आहे.सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग, डॉ. अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, स्थानिक गुन्हे शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि आशिष कांबळे, सपोफौ कल्याण ढवणे, शरद कदम, सचिन इंगळे, सुरन हेंबाडे, सचिन हेंबाडे, प्रसाद औटी, विजय कांबळे, सुनिल बनसोडे, समाधान माने, शहाजी मंडले, बजरंग बिचुकले, निलेश कांबळे, अनिस शेख तसेच सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे.

## हनुमान जयंती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभाग डोंबिवली ८/ ग प्रभाग स्वच्छता निरीक्षक रोहिदास पाटील आणि त्यांचे स्वच्छता दूत यांनी डोंबिवली पूर्वेतील गांधी चौक, गांधी नगर, गावदेवी मंदिर, पांडुरंग वाडी, मानपाडा रोड रात्रीच्या वेळी आपले



सर्व टीम घेऊन पूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आली. हे मोहिम महापालिका उपायुक्त परिमंडल ०२ रमेश मि साळ घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील व स्वच्छता अधिकारी शरद पांढरे आणि डोंबिवली पूर्व ८/ग प्रभागाचे सहाय्यक आयुक्त संजय कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आलेली माहिती त्यांनी दिली.

# नांदेड जिल्ह्यासाठी हवामान खात्याचा इशारा

## रविवार व सोमवारी येलो अलर्ट जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नांदेड :** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १३ व १४ एप्रिल हे दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगाच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**या गोष्टी करा -**

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या.

घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका -**

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईप लाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका.

विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे, असेही आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# ‘शासन आपल्या मोबाईलवर’ उपक्रमामुळे सुसंवाद वाढेल - पालकमंत्री राठोड

## उपक्रमाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन; नागरिकांच्या वेळ, पैसा, श्रमाची बचत



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, यवतमाळ :** सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक, गतिमान सेवा देण्याचे शासनाने धोरण आहे. त्यासाठी शासनस्तरावरून वेगवेगळे कार्यक्रम देखील राबविले जातात. यवतमाळ जिल्हा प्रशासनाने सुरु केलेल्या ‘शासन आपल्या मोबाईलवर’ या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक व प्रशासनामध्ये सुसंवाद वाढेल, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतूक देखील केले.जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते ‘शासन आपल्या मोबाईलवर’ या उपक्रमाचे उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, तहसिलदार आदित्य शेंडे व सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार ऑनलाईन उपस्थित होते. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून ‘शासन आपल्या मोबाईलवर’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उपक्रमांतर्गत प्रशासनाच्यावतीने यु-ट्यूब चॅनल तयार करण्यात आले आहे. या चॅनेलवर महसूल विभागाचे विविध विषय जसे, जमिनीची नोंदणी, फेरफार नोंदी, अकृषक परवानगी, विविध दाखले, वनहक्क कायदा, रस्ते संबंधी वाद, शिधापत्रिका, जमीन प्रकार, सातबारा, वारस नोंदी, भूसंपादन प्रक्रिया, मतदार नोंदणी प्रक्रिया, कलम १५५ दुरुस्ती पद्धत, अतिक्रमन नियमित करणे, नैसर्गिक आपत्ती, जन्म मृत्यूची उशिरा नोंदणी, शेती घेतांना घ्यावयाची दक्षता, सहधारकांमध्ये हिस्से वाटप, अर्धन्यायिक प्रक्रिया, सामाजिक अर्थसहाय्य योजना, पोटखराब जमीन वापरात आणणे, गौण खनिज संदर्भात माहिती, अदिवासी जमिनींचे व्यवहार अशा विविध विषयांची माहिती चॅनेलच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. पुढील टप्प्यात विविध शासकीय विभागाच्या योजना देखील उपलब्ध होणार आहे.

संबंधित विषयाची सविस्तर माहिती उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांनी स्वत: व्हिडीओच्या माध्यमातून दिली आहे. विषय समजून सांगतांना त्याचे बारकाने, नियम, अटी, दक्षता, काळजी यावर देखील माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे घरबसल्या महसूलसह विविध विभागांच्या किचकट प्रक्रिया देखील नागरिकांना सोप्या भाषेत स्वत: अधिकाऱ्यांकडून माहिती होतील.जिल्हाधिकाऱ्यांनी अगदी काही दिवसात हा उपक्रम सुरु केला. जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक सेवा, पारदर्शक आणि गतिमानपणे मिळण्यासोबतच त्यांचा पैसा, वेळ आणि परिश्रम वाचविण्यासाठी हा नाविण्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. वेळोवेळी उद्भवणारे विषय देखील या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

हा उपक्रम अतिशय चांगला असून सोप्या भाषेत नागरिकांना विविध योजना, उपक्रम आत्मसात होईल, असे पालकमंत्री यावेळी म्हणाले.ऑनलाईन उपस्थित असलेल्या सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदारांशी देखील पालकमंत्र्यांनी संवाद साधला. उपक्रमांतर्गत उत्तम काम करून नागरिकांना अधिकाधिक सेवा कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येईल, यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी यावेळी उपक्रमाची भूमिका, गरज आणि महत्व विषद केले. सुरुवातीस कळ दाबून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महसूल अधिकाऱ्यांसह सर्व विभागीय अधिकारी उपस्थित होते.

# महाबळेश्वर महापर्यटन उत्सव २०२५ विविध विभागांनी समन्वयातून तयारी करावी - जिल्हाधिकारी पाटील




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, सातारा :** महाबळेश्वर येथे महापर्यटन उत्सव २०२५ चे २ ते ४ मे या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला राज्यभरातून पर्यटक येणार असून कोणत्याही पर्यटकाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन उत्सव यशस्वी होण्यासाठी सर्वांनी समन्वयातून काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

महाबळेश्वर येथील वन विभागाच्या हिरडा विश्रामगृहात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी श्री.पाटील बोलत होते. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार तेजस्विनी पाटील अजित पाटील सोनाली मेटकरी, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उत्सव कालावधीत पर्यटकांची गर्दी होऊन वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता पोलीस विभागांनी घ्यावी, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, महाबळेश्वरला येण्यासाठी वाई, सातारा कोकणातून रस्ते आहेत या रस्त्यांवरील कामे व महाबळेश्वर अंतर्गत रस्त्यांची कामे उत्सवापूर्वी पूर्ण करावीत. त्याचबरोबर महाबळेश्वर शहर सुशोभीकरण करावे. या उत्सवाला जास्तीत जास्त पर्यटक येण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करून प्रसिद्धी द्यावी. या उत्सवामध्ये स्थानिक व्यावसायिकांचाही सहभाग घ्यावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री.पाटील यांनी दिले. ज्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे, त्या ठिकानाहुन पोहोचण्यासाठी बस उपलब्ध करून देण्यात यावी. या बस मधून पर्यटकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोच करावे. आपत्ती व्यवस्थापनासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. येणाऱ्या पर्यटकांच्या आरोग्यदृष्टीने आराखडा तयार करावा. महापर्यटन उत्सव महाबळेश्वर काम ज्या संस्थेला दिले आहे त्या संस्थेशी समन्वय साधून विविध विभागांनी उत्सवासंदर्भातील कामे पूर्ण करावी.

संस्थेने विविध प्रकारच्या ऐतिहासिक थीमचा वापर करून कार्यक्रमाच्या ठिकाणचे प्रवेशद्वार तयार करावे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये स्थानिकांचा सहभाग घ्यावा. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पर्यटन पॉईंटचे पोलीस व सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्वेक्षण करावे. त्याचबरोबर कृषी विभागाने उत्सव काळात तृणधान्य महोत्सवाचे आयोजन ही करावे अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी बैठकीत दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. नागराजन म्हणाल्या, उत्सव कालावधीमध्ये बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री होण्यासाठी स्टॉल उपलब्ध करून द्यावे. संस्थेने एकाच कार्यक्रमावर लक्ष केंद्रित न करता विविध कार्यक्रम दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. पोलीस अधीक्षक श्री. शेख म्हणाले, उत्सव कालावधीत गर्दी होणार नाही व वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही याची दक्षता पोलीस विभागाकडून घेतली जाईल. घाटातील ज्या ठिकाणी कठडे तुटलेले आहेत, त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने कटडे दुरुस्त करावेत. वाहन बंद पडल्यास ते हलवण्यासाठी क्रेनची व्यवस्था ही केली जाईल. तसेच उत्सव काळात ज्या ज्या ठिकाणी कार्यक्रम आहेत याची माहिती असणारे माहितीपत्र छापावेत व त्यावर क्यूआर कोड चा वापर करावा अशा सूचना उत्सवाचे काम करणाऱ्या संस्थेला केल्या.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, १४ एप्रिल




२०२५ रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणूकीसाठी पनवेल कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. या मिरवणूकीची सुरुवात सकाळी ७:३० वाजता पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, पूजापाठ करून होणार आहे. त्यानंतर लगेच या ठिकाणाहून भव्य मिरवणूक निघणार असून, तिचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे होणार आहे.

# थोडक्यात

## सुंदरगडावर हनुमान जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१२, पाटण (सातारा) :** सुंदरगड (दातेगड) वरील ऐतिहासिक ठेवा असलेल्या खंजीर दरवाजात कातळात कोरलेल्या शक्ती देवता हनुमान मुर्तीवर हनुमान जयंती निमित्ताने आज पहाटे भाविकांनी पूजापाठ अभिषेक करुन हनुमान जयंती उत्साहात साजरी केली. यावेळी बजरंग गर्जना, शिवगर्जनाने सुंदर गडावर भाविकांनी जल्लोष साजरा केला. यासह पाटण येथील रामापूर हनुमान मंदिर, लायब्ररी चौक हनुमान मंदिर, पोलिस वसाहत हनुमान मंदिर, ब्राम्हणपूरी हनुमान मंदीर यासह विविध ठिकाणी उत्साहाच्या वातावरणात भाविकांनी हनुमान जयंती साजरी केली.

हनुमान जयंती निमित्ताने सुंदरगडावर ऐतिहासिक ठेवा असलेल्या खंजीर दरवाजातील कातळात कोरलेल्या हनुमान मूर्तीवर पंचगंगा, दुग्धाभिषेक अर्पण करून पुजा करण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी बजरंग गर्जना, शिवगर्जना घोषणांनी जयघोष केला. तत्पूर्वी सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान, सुंदरगड संवर्धनाच्या मावळ्यांनी खंजीर दरवाजा व परिसराची स्वच्छता केली. श्री हनुमान व श्री गणेश मूर्तींवर अभिषेक करुन फुलांची पूजा मांडण्यात आली. भाविकांच्या उपस्थितीत सुंदरगडावर हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अनेक भाविकांनी गड व गड परिसर पाहण्याचा आनंद घेतला. यासह पाटण येथील रामापूर हनुमान मंदिर, लायब्ररी चौक हनुमान मंदिर, पोलिस वसाहत हनुमान मंदिर, ब्राम्हणपूरी हनुमान मंदीर यासह विविध ठिकाणी उत्साहाच्या वातावरणात भाविकांनी हनुमान जयंती साजरी केली.

## जुन्या पेन्शन संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी प्रविण झावरे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, शाखा अहिल्यानगरच्या जिल्हा कार्यकारणीच्या निवडीसाठी शेतकरी भवन, मार्केट यार्ड येथे सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेचे नेतृत्व आणि अध्यक्षता राज्य सहकार्य अध्यक्ष राजेंद्र ठोकळ यांनी केली. तर राज्य निरीक्षक रामदास वाघ आणि सुमित बच्छाव यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळीमेळीच्या वातावरणात संपूर्ण जिल्हा कार्यकारणी, उच्चअधिकार समिती आणि सल्लागार समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी पार पडल्या. नविन जिल्हा कार्यकारणीमध्ये प्रविणकुमार झावरे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाली. मनीषा वाकचौरे यांना महिला आघाडी जिल्हाध्यक्ष, निलेश राजवळ यांना जिल्हा सल्लागार, राज कदम यांना जिल्हा कार्याध्यक्ष, शिवनाथ भुजबळ यांना जिल्हा सरचिटणीस, अरविंद थोरात यांना जिल्हा कोषाध्यक्ष, मच्छिंद्र कदम यांना दक्षिण जिल्हाप्रमुख, सय्यद तोसीफ यांना उत्तर जिल्हाप्रमुख, रामदास चौरे, अशोक ढोले आणि सोन्याबापू भांड यांना जिल्हा उपाध्यक्ष, संतोष जाधव यांना सहकार्याध्यक्ष, संदीप कवडे यांना सहसरचिटणीस, नितीन दळवी यांना कार्यालयीन चिटणीस, शैलेश खणकर यांना जिल्हा प्रवक्ते, संदीप भालेराव यांना जिल्हा प्रसिद्धीप्रमुख, रमेश थोरात यांना जिल्हा संपर्कप्रमुख, नितीन भोईटे आणि आशिष पठारे यांना जिल्हा संघटक, तर संदीप पागिरे यांना सोशल मीडिया प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. जिल्हा उच्चअधिकार समितीमध्ये केशवराज कोल्हे यांची जिल्हाध्यक्ष, देवेंद्र आंबेटकर यांची सरचिटणीस, भाऊसाहेब गिरमकर यांची कार्याध्यक्ष, प्रतीक नेटके यांची कोषाध्यक्ष, भाऊसाहेब पाचरणे आणि सतीश चव्हाण यांची उपाध्यक्ष, तर प्रशांत गवारी यांची सल्लागार म्हणून निवड झाली.सल्लागार समितीमध्ये ज्ञानेश्वर सोनवणे, शरद कोतकर, शिवाजी आव्हाड, सतीश पठारे, अशोक जाधव, अरुण पठाडे, संदीप खाडे, संतोष हजारे, राम हरी बांगर, बाबासाहेब म्हस्के आणि राजेश्वर पवार यांचा समावेश आहे. सभेच्या यशस्वीतेसाठी माजी जिल्हाध्यक्ष नानासाहेब गाढवे, शरद कोतकर, सचिन नाबगे, एकनाथ रहाटे, अमोल साळवे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष आणि तालुका कार्यकारणी यांनी परिश्रम घेतले. जिल्हाभरातून बहुसंख्य पेन्शन शिलेदार उपस्थित होते.या विचार सभेत जुन्या पेन्शन योजनेच्या प्रश्नावर पुन्हा राज्यभरात तीव्र लढा उभारण्याचा संकल्प घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नानासाहेब गाढवे यांनी केले, सूत्रसंचालन केशव कोल्हे यांनी तर आभार प्रदर्शन सचिन नाबगे यांनी केले. सर्वांच्या एकजुटीने सभा यशस्वी झाली आणि संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## बिलोली शहरात २२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नांदेड :** जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी बिलोली शहरात अचानक धाडी टाकून २२ तंबाखू विक्रेत्यांकडून १० हजार ७०० रुपये दंड आकारण्यात आला. ही कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बिलोली शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार ही कार्यवाही करण्यात आली आहे.

सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांनी केले आहे.

या पथकात जिल्हा सल्लागार डॉ.शितल चातुरे, दंत शल्य चिकित्सक डॉ.पूजा काळे, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, समुपदेशक दिनेश तळणे तसेच केस रजिस्ट्री सहाय्यक सुनील तोटेवाड व मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे मंगेश गायकवाड तसेच बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल ए.एस.अचेवाड व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.